## उसनवारी

मनाच्या तळघरात दाबून टाकलेला
पण कधी काळी श्वास होवून जगलेला
तो प्रेमाचा तुकडा, आज उसना घेतला,
आणि हिरवे केले काही क्षण...
दुष्काळलेल्या भावनांचे ओले केले काही पदर
स्पर्शाच्या खुणा टिपून घेतल्या
मौनाची गीते गावून घेतली
काही घटकांचं गोठलेपण, सैल केलं...
भिनू दिला वारा,
प्रश्नं, उत्तरं याच्या चक्रात न अडकता,
ऐकली मनाची कोवळी हाक.
तापलेल्या रुधीराची, शमवली आग
त्या उसन्या प्रेमाचा उसना रोमांच,
लेवून घेतला अंगभर...
......
उसने घेतलेले सगळे
परत तर करायचेच होते - व्याजासकट,
म्हणूनच
मनाच्या तळघरात
तो प्रेमाचा उसना तुकडा
परत एकदा दाबून टाकताना
दाबून टाकली त्याला चिकटलेली
उसनी एक गोड आठवण....

**©प्रीती देशपांडे**